प्रति,

**शाखा व्यवस्थापक,**
**भारतीय स्टेट बँक ऑफ इंडीया,**
**मेन ब्रँच, पाटणी चौक, वाशिम ४४४५०५.**

क्रमांकः पोअवा/ लेशा/वेतन/संकीर्ण/२०२०, वाशिम. 5098 21 SEP 2020 दिनांकः- १४/०९/२०२०

विषय- पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना पर्सनल लोन मंजूर करण्यापूर्वी आहरण व संवितरण अधिकारी (DDO) यांच्या स्वाक्षरीने दयावयाच्या सर्विस सर्टिफिकेट (Service Certificate) बाबत.

********

उपरोक्त संदर्भित विषयान्वये कळविण्यात येते की, पोलीस अधिक्षक, वाशिम कार्यालयाच्या आस्थापनेवरिल पोलीस अधिकारी/कर्मचारी हे वैयक्तीक कामाकरिता पर्सनल लोन मिळणेबाबतचे विनंती अर्ज भारतीय स्टेट बँक ऑफ इंडीया, मेन ब्रँच, पाटणी चौक, वाशिम शाखेकडे सादर करित असतात. सदरहू अर्ज सादर केल्यानंतर पर्सनल लोन मंजूर करण्यापूर्वी पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना **सर्विस सर्टिफिकेट (Service Certificate)** आहरण व संवितरण अधिकारी (DDO) यांच्या स्वाक्षरीने साक्षांकीत करून आणण्याबाबत अवगत केले जाते.

सर्विस सर्टिफिकेट (Service Certificate) मध्ये नमुद असलेली माहिती जसे की, **नाव, बक्कल नंबर, कार्यरत ठिकाण, जन्मदिनांक, सेवानिवृत्ती दिनांक, भरती दिनांक, सदयाचा पत्ता, कायमचा पत्ता** इत्यादी माहिती ही पोलीस अधिकारी /कर्मचारी यांच्या ओळखपत्र, वेतन पावती तसेच नियुक्ती आदेशामध्ये नमुद असते.

पोलीस अधिकारी/कर्मचारी पर्सनल लोन वैयक्तीक कामासाठी घेतात. सदरहू लोनचा अथवा लोनच्या परतफेडीचा हया कार्यालयाशी अथवा आहरण व संवितरण अधिकारी (DDO) यांच्याशी काहीएक संबंध नाही.

यास्तव पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना पर्सनल लोन मंजूर करतांना सर्विस सर्टिफिकेट (Service Certificate) ऐवजी पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या ओळखपत्र, वेतन पावती अथवा नियुक्ती आदेशाची प्रत प्राप्त करून घ्यावी ही विनंती.

( वसंत परदेशी )
भा.पो.से.,
पोलीस अधिक्षक, वाशिम.

प्रत- संगणक कक्ष, पो.अ.कार्यालय, वाशिम.
सदरहू प्रत सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या माहितीकरिता वाशिम पोलीस दलाच्या संकेतस्थवर प्रसिध्द करावी.